म.न.पा. ठराव क्र. 8 दिनांक 20.03.2017 अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 30 (3) नुसार गठित कर आकारणी व कर संकलन विशेष समितीची सभा सोमवार दिनांक 29.05.2017 रोजी दुपारी 12–00 वाजता स्थायी समिती सभागृहात संपन्न झाली, त्या सभेतील चर्चेचा संक्षिप्त वृत्तांत.

सभेत मा.सभापती कर आकारणी व कर संकलन विशेष समिती श्री. अविनाश ठाकरे, मा. उपसभापती, श्रीमती यशश्री नंदनवार, मा. सदस्या श्रीमती सोनाली कडु, मा.सदस्या श्रीमती माधुरी ठाकरे, मा.सदस्या श्रीमती शीतल कामडे, मा.सदस्य श्री.परसराम मानवटकर, मा.सदस्या श्रीमती मंगला लांजेवार मा.उपायुक्त श्री.देवतळे साहेब, कर निर्धारक, कर विभाग, सहा.आयुक्त कर व कर आकारणी विभाग, सहा आयुक्त झोन क्र.1 ते 10, कर अधिक्षक, सहा.अधिक्षक, कर विभाग, श्री.विजय इंगळे ई–गव्हर्नन्स सेल, इतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.सभापती, यांनी सभेच्या कार्यवाहीस सुरुवात केली. सभेच्या सुरुवातीस मा.सभापती, कर आकारणी व कर संकलन समिती यांचे मा.उपायुक्त श्री.देवतळे यांनी तुळशीचे रोपटे देवुन स्वागत केले तसेच सहा. आयुक्त, लक्ष्मीनगर झोन यांनी सर्व समिती सदस्यांचे स्वागत केले. तदनंतर मा. सभापती व समितीचे मा.सदस्य तसेच सभेत उपस्थित सर्व अधिकाऱ्यांचा परिचय करुन घेण्यात आला.

तदनंतर विषयपत्रिकेवरील विषयाला सुरुवात करण्यात आली.

विषय क्र. 1 आर्थिक वर्ष 2017–2018 ची मागणी निश्चित करुन मागणी देयकांची झोन निहाय सहा.आयुक्तांकडुन खालीलप्रमाणे आढावा घेण्यात आला.

लक्ष्मीनगर झोन क्र. 1 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई–गव्हंनस नुसार 11273.58 कोटी रुपयांचे उद्दीष्ट आहे त्यापैकी 146.95 रुपयांची वसुली करण्यात आली. नविन मालमत्ता 73,208 आहे. अभय योजनेअंतर्गत 6 कोटी रुपयांची वसुली करण्यात आली. एकुन 61 लक्ष रुपयांचे 159 चेक बाउन्स होते, त्यापैकी 105 धनादेशाची वसुली करण्यात आली उर्वरीत 34 लक्ष रुपयांचे 54 चेकची राशी वसुल करायची आहे.

धरमपेठ झोन क्र. 2 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई–गव्र्हनस नुसार 5700.24 रुपयांचे उद्दीष्ट दिले आहे त्यापैकी 89.11 रुपयांची वसुली करण्यात आली नविन मालमत्ता 38331 आहे. अभय योजनेमध्ये 5.25 कोटी रुपयांची वसुली करण्यात आली.

हनुमाननगर झोन क्र 3 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई–गव्र्हनस नुसार 4303.53 रुपयांचे उद्दीष्ट होते त्यापैकी 131.04 रुपयांची वसुली करण्यात आली. अभय योजनेअंतर्गत 3 कोटी रुपयांची वसुली करण्यात आली.

धंतोली झोन क्र 4 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई–गव्र्हनस नुसार 3350.20 रुपयांचे उद्दीष्ट दिले आहे. त्यापैकी 48.70 रुपयांची वसुली करण्यात आली. एकुन नविन मालमत्ता 21,155 आहेत. अभय योजनेअंतर्गत 1 कोटी 40 लक्ष रुपयांची वसुली केली आहे.

नेहरुनगर झोन क्र 5 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई–गर्व्हनस नुसार 2891.30 रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी 101.26 वसुली करण्यात आली.अभय योजनेअंतर्गत 16 लक्ष रुपयांचे 37 चेक बॅलन्स आहे. एकुन नविन मालमत्ता 57384 आहेत.

गांधीबाग झोन क्र 6 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई –गर्व्हनस नुसार 1575.12 रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी 33.83 रुपयांची वसुली करण्यात आली. एकुन नविन मालमत्ता 25262 आहेत.

सतरंजीपुरा झोन क्र 7 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई –गर्व्हनस नुसार 1388.80 रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी 780.82 रुपयांची वसुली करण्यात आली. एकुन नविन मालमत्ता 34610 आहेत. अभय योजनेमध्ये 1100 मालमत्ताधारकांना लाभ झालेला आहे.

लकडगंज झोन क्र 8 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई –गर्व्हनस नुसार 5945.56 रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी 92061 रुपयांची वसुली करण्यात आली. एकुन नविन मालमत्ता 92061 आहेत.

आशीनगर झोन क्र 9 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई –गर्व्हनस नुसार 4066.39 रुपयांचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी 91.24 रुपयांची वसुली करण्यात आली. एकुन नविन मालमत्ता 73615 आहेत. बाउन्स चेक 42 होते त्यापैकी 25 चेक मध्ये वसुली करण्यात आली आहे. अभय योजनेअंतर्गत 65 लक्ष रुपये वसुली केले आहे.

मंगळवारी झोन क्र 10 :– आर्थिक वर्ष 2017–18 करिता ई–गर्व्हनस नुसार 5088.78 रुपयांचे उद्दीष्टे देण्यात आले. त्यापैकी 119.37 रुपयांची वसुली करण्यात आली. 62105 नविन प्रॉपट्री शोधण्यात आल्या. अभय योजनेअंतर्गत 4 कोटी रुपयांची वसुली करण्यात आली.

तदनंतर मा.सभापती यांनी खालील प्रमाणे निर्देश दिले.

1. अभय योजनेअंतर्गत किती मालमत्ता आलेल्या नाहीत त्याची डिटेल्स रिपोर्ट सादर करावे.
2. अभय योजनेअंतर्गत किती मालमत्ता क्लीअर झाल्या किती मालमत्ता क्लीअर झालेल्या नाहीत त्यामध्ये किती रक्कम गुंतलेली आहे याची सविस्तर माहिती दयावी.
3. ज्या शासकीय मालमत्तांवर कर आकारण्यात आला नाही त्या संदर्भात सर्व सहा. आयुक्तांनी झोनस्तरावर त्यांची यादी अद्ययावत करुन माहिती दयावी.
4. मागील काही वर्षामध्ये ज्या लोकांनी करांचा भरणा केला नाही किंवा अर्धवट भरणा केला आहे अशा नागरिकांची यादी देण्यात यावी.
5. भाडेकरु सोडुन गेले असतांनाही त्यांना जास्तीचा कर भरावा लागत आहे त्यांच्या अर्जावर तातडीने कार्यवाही करावी.
6. पाण्याचे रितसर मीटर असतांनाही आमपाणीकर बिलामध्ये लागुन येत आहे किंवा चुकीच्या पध्दतीने असेसमेंट झाले असल्यामुळे जास्तीचा कर भरावा लागत आहे अशा अर्जावर

सुनावणी झालेली नाही असे प्रलंबित प्रकरणे कॅटीगिरीवाईज करुन त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यात यावी.

7 रिसीप्ट जनरेशनच्या वेळी मोबाईल नं. टाकणे आवश्यक आहे मो.न. टाकला नसल्यास रिसीप्ट जनरेट करु नये.

8. सहा आयुक्तांना काही समस्या व अडचणी असतील तर झोनस्तरावर एकमताने ठराव पारीत करुन मुख्यालयाकडे पाठवावे.

सहा.आयुक्त श्री.मेश्राम यांनी अभय योजनेसंदर्भात माहिती देतांना सांगितले की, करदात्यांना प्रेरीत करण्यासंदर्भात दि. 17 मार्च ते 31 मार्च दरम्यान राबविलेल्या अभय योजना सर्व झोनस्तरावर यशस्वीरित्या राबविण्यात आली होती अभय योजनेअंतर्गत दंडाची रक्कम माफ करण्यात आली या योजनेला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला परंतु अनेकांनी दंडाची रक्कम माफ करण्यासाठी महानगरपालिकेला धनादेश दिला या योजनेअंतर्गत 3 कोटी 5 लक्ष 86, हजार 220 रुपयांचे 765 चेक बाउन्स झाले असल्याची त्यांनी माहिती दिली.

विषय क्र.2 मालमत्ता कर वसुली रोखविरहीत (cashless) व्यवहारातुन होणेबाबत करदात्यांना तशा सुविधा पुरविणेबाबत जसे की जास्तीत जास्त ECS based Payments Facilities उपलब्ध करुन देणेबाबत सार्वजनिक ठिकाणी Kiosk मशीन लावणेबाबत मा.सभापती यांनी सुचित केले की, यामध्ये मशीन मार्फत मालमत्ता कर स्विकारणे व स्वीकारलेल्या मालमत्ता कराची पावती कुरीअरने मालमत्ता धारकाकडे पोहचविण्याबाबत प्रस्ताव स्थायी समितीकडे सादर करण्याकरिता एकमताने मंजुरी प्रदान केली.

विषय क्र. 3 सद्यस्थितीत असलेल्या मालमत्ता कर निर्धारणाच्या पध्दतीबाबत सहा.आयुक्त श्री.मेश्राम यांनी समिती सदस्यांना सविस्तर माहिती दिली.

विषय क्र.4 नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, विभागाव्दारे होणाऱ्या मिळकतीच्या खरेदी विक्रीची व्यवहारांच्या नोंदणी करतांना मालमत्ता कर व कर आकारणी विभागांच्या विभाग प्रमुखांचे अद्यावत मालमत्ता कर जमा झाल्याचे ना हरकत प्रमाणपत्राची सक्ती करण्यासंदर्भात सदर प्रस्ताव सभागृहाची मान्यतेकरिता सादर प्रस्तुत करण्यात आलेल्या विषयाची समितीने नोंद घेतली.

तदनंतर मा.सभापती, कर आकारणी व कर संकलन विशेष समिती यांनी सभेचे समापन केले.

निगम सचिव
महानगरपालिका नागपूर

सभापती
कर आकारणी व कर संकलन विशेष समिती